: प्रकरण चौथे :

# महात्मा जोतिबा फुले यांची सत्यशोधकाची स्थापना व कार्य

: प्रकरण चौथे :

# महात्मा जोतिबा फुले यांची सत्यशोधकाची स्थापना व कार्य

एकंदरीत अभ्यास करताना मध्यकाळातील राजकीय धार्मिक, आर्थिक क्षेत्र हे मूठभर उच्चवर्णीयांच्या हाती असलेली दिसून येते. सर्वसाधारणपणे समाजात स्थैर्यता आणण्यासाठी धर्माच्या नैतिकतेचा व बंधनाचा उपयोग केला जात होता.

शिक्षणापासून वंचित असलेला समाज धार्मिकतेच्या नावाखाली रूढी, प्रथा, परंपरेच्या भोवऱ्यात गुरफटलेला होता. समाजात असणाऱ्या या कमकुवतपणाचा फायदा मात्र पौरोहित ब्राह्मणवर्ग मोठ्या प्रमाणात घेत होता. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेणाऱ्या प्रवृत्ती सर्वकाळी सामाजात असतात त्यांच्याविरोधी काही समाजसुधारकांनी बंड करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

अशा कालखंडात फुल्यांचे कार्य नेटाने चालूच होते. जोतीबांनी आपले आयुष्य 20-25 वर्षे समाजसेवेत घालविले. सभा, पुस्तकातून, पत्रिकेतून ते आपले विचार मांडीत. त्यांचे विचार वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध होत होते. कनिष्ठ वर्गाकरिता त्यांनी 'गुलामगिरी' हा उपदेशपर ग्रंथ लिहिला. याच सुमारास 'ब्राह्मणांचे कसब' व 'जातिभेद विवेकसार' हे दोन ग्रंथही प्रसिद्ध केले. हे करीत असताना सुधारणेच्या मार्गातील येणाऱ्या अडचणीचा अभ्यासही त्यांनी केला होता.[1] कनिष्ठ वर्गांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन ते त्यांनी आपल्या मुलांना द्यावे, असा ते उपदेश करीत राहिले होते. धर्मभोळ्या, वेडगळ रूढी, समजुती यांना मूठमाती देण्याचे आवाहन करून स्वत:ला मुक्त करा असा पाठपुरावा ते सातत्याने करीत होते. ब्राह्मणी शास्त्रांनी लादलेली गुलामगिरी विधीलिखित नाही किंवा देवनिर्मित नाही. हे कनिष्ठ लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न वारंवार करीत होते. कष्टकरी वर्गात आत्मविश्वास व आत्मसन्मान

जागविण्याचा, जाणिव जागृत करण्याचा प्रयत्न केला. दारिद्र्य, जातीयुक्त सामाजिक अन्याय त्यावर आधारित व्यवस्था, जुलमी, अन्यायी सामाजिक व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचे धैर्य या लोकांमध्ये निर्माण केले.

सरकारी वेगवेगळ्या खात्यातून होणारे लाचलुचपतीचे व्यवहार, गोरगरिबांची पिळवणूक, न्यायाकडे अधिकाऱ्यांचे होणारे दुर्लक्ष या गोष्टी ते सतत उघडकीस आणत राहिले. शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, दारिद्र्याच्या चिखलात ते अधिकाधिक कसे रूतत चाललेत, सामाजिक अन्यायाखाली कोणत्या रितीने पिचत चाललेत हे त्यांना सरकारच्या लक्षात आणून दयावयाचे होते. [2]

फुल्यांनी स्त्री-शूद्र-अतिशूद्र यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी ब्राह्मण नेतृत्व व विचार यावर प्रखर हल्ले केले. श्रमिक शोषितांच्या हिताच्या आड जे येईल त्याच्या विरोधात त्यांनी आवाज उठविला. ब्राह्मणाशिवाय इतर कोणत्याही उच्च जातीचा हितसंबंध राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. त्यांचा हा प्राथमिक अविष्कार असला तरी त्यांची वैचारिक बैठक समतेची, मानवतेची व विश्वकुटुंबाची होती. यातच त्यांना समाजाचे कल्याण व हित दिसत होते. [3]

## सत्यशोधक समाजाची स्थापना :-

जोतीराव करीत असलेल्या प्रचाराचा प्रसार जेवढा हवा तसा होत नव्हता. जोतीरावांची स्वतंत्र मतप्रणाली होती. धोरणाला पोषक असे तत्वज्ञान होते. कार्याचा प्रचार व प्रसार अधिक नेटाने होणे आवश्यक होते, यासाठी सामुदायिक स्वरूपाची एखादी संस्था स्थापून त्यामार्फत चळवळ सुरू करणे गरजेचे वाटू लागले. काही कनिष्ठ वर्गातील बहुजन समाजातील तरूण विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडत होते.[4] तेव्हा या कार्याकरिता सुशिक्षित ब्राह्मणेतरांची एक सामुदायिक स्वरूपाची संस्था स्थापून त्यामार्फत ही चळवळ चालू करणे त्यांना अगत्याचे वाटू लागले.

आपला हा हेतू तडीस नेण्यासाठी त्यांनी पुण्यामध्ये विनंतीपत्र काढून सभा बोलाविली. यासाठी मुंबई, पुणे व इतर ठिकाणच्या सुशिक्षित मंडळींना आमंत्रणे दिली. ठरलेल्या दिवशी सर्व मिळून 50 ते 60 मंडळी सभेसाठी आली. त्या वेळी त्यांनी उत्तम तऱ्हेच्या भाषणाने आपला हेतू मांडला. त्यांच्या या कल्पनेवर बरेच वादविवाद व चर्चा होऊन शेवटी एक संख्या स्थापण्याचे निश्चित झाले. [5] भवती न भवती होऊन सर्वांच्या विचाराने 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना जोतीराव फुले यांनी केली. ही सभा पुणे येथे झाली. समाज सुधारणा चळवळ करणारी महाराष्ट्रातील ही पहिलीच संस्था म्हणता येईल. [6] सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड झाली.[7] अशा रीतिने सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली.

## सत्यशोधक समाजाचा उद्देश :-

सामाजिक शोषणातून मानवांना मुक्त करणे सत्याचे खरे स्वरूप स्पष्ट करणे व गुलामगिरीत रखडत पडलेल्या 'विश्वमानवाला' मुक्त करण्याची जाणिव यामध्येच त्यांच्या बंडाची प्रेरणा सामावलेली दिसते. यासाठी सत्यशोधक समाजाने 'सत्यशोधन' करणे हा आपल्या आंदोलनाचा प्रमुख उद्देश ठरविला. जे खोटे, ढोंगी, लबाडीचे, बनावट, मतलबी असेल ते समाजाच्या उंबरठयावर निर्भिडपणे मांडावयाचे, मागासलेल्या वर्गातील वेड्या कल्पना नष्ट करून आपल्या बुद्धीने विचार करून खरे-खोटे, बरे-वाईट ठरविण्यास कनिष्ठ, शूद्र लोकांना समर्थ करणे असा हेतू होता.[8]

शूद्र आणि अतिशूद्र यांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना मानवी हक्कांची अन अधिकारांची शिकवणूक देणे, ब्राह्मणी शास्त्रांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे, हे सत्यशोधकाचे ध्येयधोरण होते.[9] अशा प्रकारे उच्चवर्गीयांपासून सर्वसामान्य, शूद्र, अतिशूद्र लोकांना मुक्त करून विकास करणे हा महत्वपूर्ण उद्देश सत्यशोधक समाजाचा असलेला

दिसून येतो.

**प्रमुख तत्वे :-** सत्यशोधक समाजाची प्रमुख तीन तत्वे आहेत ती अशी -

1) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण, व सत्यरूप आहे. आणि सर्व मानवप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

2) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरूरी नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भट दलालाची आवश्यकता नाही.

3) कोणीही जातीने श्रेष्ठ नसून फक्त गुणाने श्रेष्ठ ठरतो. [10]

एकंदरीत पाहता सत्यशोधक समाजाची तत्वे यापेक्षाही व्यापक आहेत. ईश्वर एक असून तो कोंडलेला नसतो, तो डोंगरावर, नदी किनारी न राहता सर्वव्यापी आहे. त्याच्याजवळ भेदभाव नसतो. सर्व मानव त्यास समान आहेत. सत्यशोधक समाजाच्या पहिल्या तत्वात सांगितले आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे. आपल्या भक्तीने ईश्वराला प्रसन्न करता येते. याकरिता पुरोहिताची आवश्यकता नाही. हे दुसऱ्या तत्वात सांगितले आहे.

उच्चनीचतेच्या केवळ भ्रामक समजुतींमुळे सद्‌गुणांचा, कारागिरीचा लोप झाला. म्हणून जोतीरावांनी जन्माने ठरलेल्या उच्चनीचतेचा धिक्कार केला. मनुष्य जातीने श्रेष्ठ बनत नसून गुणांनी श्रेष्ठ बनतो. असे मानवी उत्कर्षाचे व स्वातंत्र्याचे सत्यतत्व जोतीरावांनी सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या तत्वात अंतर्भूत केले होते.[11] अशा प्रकारची सत्यशोधक समाजाची तत्वे व तत्वार्थ असलेली दिसून येतात. अशा प्रकारे सामाजिक विषमता व मानसिक, धार्मिक गुलामगिरीतून मानवास मुक्त होण्यास सत्यशोधक समाज

सहाय्यभूत ठरतो.

**त्रिसूत्र कार्यक्रम :-**

सत्यशोधक समाजाने आपला कार्यक्रम जाहीर केला. त्याला त्रिसूत्र कार्यक्रम म्हणून ओळखले जात होते. हा कार्यक्रम पुढील प्रमाणे -

1) ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्थांची गरज नाही. भट-भिक्षुक धर्माचा धाक दाखवून अडाणी जनतेची अर्धमाने जी पिळवणूक करतात त्या अन्यायापासून त्यांची मुक्तता करणे.

2) जमीनदार-सावकार यांच्या मगर मिठीतून शेतकऱ्यांची सुटका करणे.

3) शिक्षण सर्वांना सहज लाभावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.[12]

एकंदरीत सत्यशोधक समाजाच्या त्रिसूत्री कार्यक्रमावरून असे वाटते की हिंदू धर्मामध्ये जातिभेदाच्या नावाखाली उच्च व ब्राह्म वर्गाकडून इतर वर्गाची परवड मोठ्या प्रमाणात होत होती. शूद्र-अतिशूद्रांप्रमाणेच स्त्री वर्गाची अवहेलना, मानहानी होत होती. धर्माच्या नावावर लोकभ्रम, वाईट चालीरीती, विवेकहीन कर्मकांडे होत होती. या सर्वात स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणात बळी पडला जात होता. या सर्व वर्गांना यामधून बाहरे काढणे हेच सत्यशोधक समाजाचे महत्त्वपूर्ण उद्दीष्ट होते.

या पद्धतीच्या त्रीसूत्र कार्यक्रमाने हे सत्यशोधक समाजाचे कार्य चालू होते. सत्यशोधक समाजाचे सभासद होताना प्रत्येकाला शपथ घ्यावी लागे. सत्यशोधक समाजाचे सभासदत्व सर्व जातीतील लोकांना मोकळे ठेवले होते. ब्राह्मण, महार, मांग, ज्यू आणि मुसलमान हे त्या चळवळीच्या आरंभी सत्यशोधक समाजाचे सभासद असलेले दिसून येते.[13]

सत्यशोधक समाजाच्या सभासदाला पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी लागत असे - ''सर्व

मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहेत, सबब ती माझी भावंडे आहेत अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अथवा ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधिचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. मी माझ्या मुलांमुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन. परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. ह्या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशाप्रकारे आयुष्यक्रम गुदरण्यास योग्य प्रकारे मदत तो मला करो.[14]

ज्या ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या होत्या त्या ठिकाणी दर अठवड्यास सभा होत असत. पुण्यातील सोमवार पेठेतील डॉ. गावडे यांच्या घरी दर आठवड्याला सभा भरत असत. त्या ठिकाणी दारूबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तू वापरण्याला प्रोत्साहन देणे, ब्राह्मणांची धार्मिक क्षेत्रातील पुरोहितगिरी झुगारून देणे, कुटुंबियांतील लग्ने अल्प खर्चात करण्याची व्यवस्था करणे. ज्योतिष, भुते आणि समंध यांच्या भीतीपासून लोकांना मुक्त करणे इ. गोष्टींसंबंधी चर्चा होत असे. जातिभेद, मूर्तीपूजा यांच्या विरूद्ध मुख्य प्रचार असे. परमेश्वराचे जनकत्व व मनुष्याचे बंधुत्व या तत्वावरही भर देण्यात येत असे.[15]

## सत्यशोधक समाजाचे कार्य :-

सत्यशोधक समाज एकंदरीत मानवी विकासाच्या आणि समानतेच्या दृष्टीकोनातून कार्य करीत. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचे अधिकार अत्यंत कठोरतेने नाकारले आहेत. अशा स्त्रीच्या स्वातंत्र्यासाठीही फुल्यांनी प्रयत्न केले.

महात्मा फुले मानव प्राण्यात स्त्री श्रेष्ठ असण्याचे कारण सांगतात, ''तीच आपणा सर्वांस जन्म देणारी सर्वांचे लालन पालन करणारी सर्वकाळ आपली काळजी वाहणारी आहे. व तिनेच आपणस बोलण्या चालण्यास शिकविले. यावरुन आबालवृद्धांत जगप्रसिद्ध म्हण पडली आहे की, सर्वांच ऋण

फिटेल, परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकर फिटणार नाहीत.''[16]

अशा प्रकारे मानव प्राण्यांत स्त्री श्रेष्ठअसूनही ती कनिष्ठच राहिली. तिला दुय्यम दर्जा मिळाला. कारण, ''स्त्रियांची जात अबला असल्यामुळे लोभी पुरूषांनी त्यास मानवी हक्क समजू देऊ नये या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्यास प्रतिबंध केला. [17] या अन्यायाची चीड जोतीरावांच्या मनात होती. स्त्रियांच्यावर होणारे अत्याचार नाहीसे व्हावेत यासाठी परंपरांच्या मागचे फोलपण त्यांना स्पष्ट करावयाचे होते. स्त्रियांच्या मिळस्त, सहनशील स्वभावाचा फायदा घेऊन त्यांच्यावर अन्याय होतो हा अन्याय कमी व्हावा असे त्यांना सतत वाटत राहिले.

जुन्या वाईट चालीरीती, अन्यायकारक प्रथा, अमानवी कृत्ये आणि असमानतेची जळमटे नाहीशी करण्यावर जोतीरावांचा भर होता. स्त्री मेल्यावर पुरूष दुसरे लग्न करतो तर पुरूष मेल्यावर स्त्रीने का विधवा रहावे ? तिलाही परत लग्न करता यावे यासाठी पुनर्विवाहास जोतीरावांनी पाठींबा दिला. स्त्री शिक्षणास सुरूवात केली. स्त्रियांना अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखविला.

पुरूष व स्त्री लग्नविधीतील एकमेकांचे सोबती होतात. लग्नावेळी जर स्त्री पुरुष समानता स्पष्ट होऊन तिचा स्वीकार पुरूषांनी केला तर स्त्री समानतेचा प्रश्न सोडवता येईल. यासाठी जोतीरावांनी सत्यशोधक पद्धतीचा लग्नविधी तयार केला. यात लग्नाचे वेळी वधू वराकडून काही आश्वासने घेते. स्त्रीची अवहेलना होऊ नये तिला स्वातंत्र्य मिळावे, समानता मिळावी यासाठी ती वचन मागते. असे प्रसंग जोतीरावांनी त्यात घातले आहेत.[18]

सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू झाले तरी ते सहज पार पाडले जाई असे नव्हते. सनातनी ब्राह्मणवाद्यांनी त्यातही विघ्ने आणण्यात सुरूवात केली होती. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या विरुद्ध प्रचार करण्यास आरंभ केला. ब्राह्मणांनी गरीब लोकांना घाबरवून सोडले. अज्ञानी लोक त्यामुळे जोतीरावांकडे

येऊन देव आमची प्रार्थना मराठीतून ऐकेल का ? असे विचारू लागले. जोतीरावांनी उत्तर दिले कि इंग्रजी, फ्रेंच भाषा यातून केलेल्या प्रार्थना देवाला ऐकू जातात ना ? तुकाराम, चोखामेळा, नामदेव यांच्या प्रार्थना देवाच्या कानी गेल्या नाहीत का ? तेव्हा असे मानणे चुकीचे आहे. सत्यशोधक समाजाचे सदस्य होऊनये म्हणून ब्राह्मण लोक खेड्यापाड्यातून प्रचार करू लागले. गरज भासल्यास धाकही दाखवू लागले. जे सदस्य असत त्यांचा छळ करत. सरकारी नोकरीत ब्राह्मण अधिकाऱ्यांच्या हाताखालील सदस्य असल्यास त्यांना छळ सोसावा लागला. केंव्हा केंव्हा नोकरीस मुकावे लागले. ब्राह्मणांच्या उपस्थितीवीणा धार्मिक विधी केला अगर संस्कार केल्यास त्या कुटुंबावर परमेश्वराचा कोप होईल किंवा शापामुळे त्यांचे नि:संतान होईल अशी भीतिही दाखवू लागत.[19]

अशा प्रकारे सत्यशोधक समाजाला हाणून पाडण्याचे कितीही प्रयत्न ब्राह्मणांनी केले तरी, जोतीराव न डगमगता त्यांच्यामध्ये ठिकठिकाणी महाराष्ट्रभर फिरून सत्यशोधक समाजाचे अनुयायी करण्याचे धाडस निर्माण झाले. त्यांनी समाजाचे नवीन सभासद मिळवण्याचा क्रम सारखा चालू ठेवून शूद्र अतिशूद्रांच्या मुलांना समाजामार्फत शिष्यवृत्त्या देण्याचे जाहिर केले. त्यामुळे बऱ्याच मुलांकडून व त्यांच्या पालकांकडून भराभर अर्ज येऊ लागले. सत्यशोधक समाज सभासदांच्या फीच्या रकमेतून 10-12 मुलांना स्कॉलरशिपस् वाटल्या गेल्या.अशा प्रकारे समाजामार्फत शिक्षण प्रसाराचे काम चालू झाले.[20]

प्रार्थनासमाज आणि ब्राह्मण समाजाप्रमाणे सत्यशोधक समाजही एकेश्वरी पंथ होता. ह्या तीनही संस्थांच्या मते सर्व मानव एकाच देवाची बालके होत. धार्मिक बाबतीत मध्यस्थ, पुरोहित किंवा गुरू नको. त्याच्या आधाराविना कोणत्याही व्यक्तीला प्रार्थना किंवा धार्मिक विधी करता येतो, अशी त्यांची शिकवण असे. प्रार्थनेवर त्यांचा भर नव्हता तर जोतीरावांनी सत्य घेऊन आपल्या कार्यास सुरूवात केली.

जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाचा जातीव्यवस्थेवर विश्वास नव्हता. तसाच

चातुर्वर्ण्यावरही नव्हता् आवश्यक थोडे धार्मिक विधी ठेवून त्यांनी धार्मिक बाबतीत मध्यस्थांची उचलबांगडी केली. ब्राह्मसमाज, प्रार्थना समाज आणि सत्यशोधक समाज या तिघांनीही मूर्तीपूजा त्याज्य ठरविली.[21] ब्राह्मणांच्या भीतीमुळे धर्मविधि प्रथम स्वहस्ते करणार तरी कोण ? अर्थात नेहमीप्रमाणे महात्मा फुल्यांनाच पुढे यावे लागले. नातलगांपैकी एकास जोतीरावांनी खासगी कामे करण्यास नोकर म्हणून ठेवला होता. त्याची बायको पूर्वीच वारली होती. गरीबीमुळे दुसरे लग्न करण्याची सोय नव्हती. शिवाय प्रथम ते अक्षरशत्रू होते. पण फुल्यांनी रोज रिकाम्या वेळेतून त्यांना लिहण्यावाचण्यास शिकविले. त्यांचे ह्यावेळी लग्न करून द्यावयाचे असा जोतीरावांनी विचार केला. आपल्या शेजारी ग्यानबा निंबणकर यांच्या मुलीला नोकर असलेल्या अल्हाटकरिता मागणी घातली. निंबणकरांच्या बायकोने आपल्या मुलांची लग्ने प्रौढपणी करण्याचे ठरविले होते. बजूबाईची मुले लग्नावाचून मोठी होताना भोळ्या लोकांनी आक्षेप घेतला. पण त्यांनी दुर्लक्ष केले. पण जोतीरावांनी आपले विचार सांगताच निबंणकरांनी मान्य केले. मात्र त्यांना समाजमते लग्न लावण्यास ब्राह्मणांची भिती वाटू लागली. तेंव्हा बायकोने बयाबाईने आग्रह धरुन त्यांचे मन वळविले. उभयपक्षाकडून फक्त पानसुपारी वाचून कोणताही खर्च न करण्याचे ठरवून जोतीरावांनी हे लग्न ता. 25 माहे डिसेंबर सन 1873 रोजी लाविले. हे लग्न न होण्यासाठी ब्राह्मणांनी फार प्रयत्न चालविले. पण बयाबाईच्या खंबीरपणामुळे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरून लग्न मोठ्या थाटात झाले. सत्यशोधक समाजाचे बहुतेक सर्व सभासद या लग्नाकरिता हजर होते. [22]

अशा पद्धतीने समाजाने पहिले लग्न लावून सत्यशोधक विवाह पद्धत अस्तित्वात आणली. मंगलाष्टके वधुवरांनी स्वत: म्हटली. कोणतेही फाजिल धर्मविधी केले गेले नाहीत. त्याकाळी ब्राह्मणांशिवाय लग्न हे एक नवल घडले. गरीबांचा कल या लग्नाकडे झुकू लागला. सत्यशोधक पद्धतीने दुसरेही लग्न करण्याचे फुल्यांनी ठरविले. हे लग्न मात्र होऊ द्यायचे नाही असा ब्राह्मणपुरोहितांनी चंग

बांधला. ग्यानोबा ससाणे नावाच्या मुलाचे लग्न ठरविले. पण ब्राह्मणांनी हे लग्न न होण्यासाठी गुंड लोकांचाही उपयोग केला. लग्नादिवशी जोतीरावांना व त्यांच्या सत्यशोधक समाजकार्यकर्त्यांना बदडून काढण्याचे ठरविले. पण जोतीरावांनी दोन वजनदार कार्यकर्त्यांकडून पोलीस बंदोबस्त ठेविला होता. ग्यानोबा ससाणे तर घाबरूनच गेला होता. जोतीरावांनी त्यास धीर दिला( लग्न पाहण्याकरिता प्रचंड जनसमुदाय जमलेला होता. शेवटी 7 मे 1874 रोजी हा विवाह सोहळा जोतीरावांच्या घरी निर्विघ्नपणे पार पडला. ''ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू लग्न' या शिर्षकाखाली वर्तमानपत्रांनी प्रसिद्धी दिली.[23] अशा तऱ्हेनी सत्यशोधक समाजाने साध्या पद्धतीने व कमी खर्चातील विवाह पद्धत सुरू केली. व हळूहळू गरीबांचा कल या लग्नाकडे वाढत गेला.

शेतकऱ्यांच्या समस्याही सत्यशोधक समाजाने हाताळण्या सुरूवात केलेली दिसून येते. सत्यशोधक प्राचरक आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या कर्जाचा उल्लेख करीत. धर्मविषी, संस्कार या नावाखाली त्याचे कसे नुकसान होते व असलेला पैसा धूर्त ब्राह्मण कसे लुबाडतो याकडे ते सामान्य जनतेचे व शेतकऱ्योच लक्ष वेधीत चांगले, वाईट, धर्म, कायदा, देव म्हणजे काय याचा उपदेश करीत.[24]

सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज हा हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर ध्येये आणि उद्दीष्टे कृतीत आणण्यासाठी जोतीरावांनी प्रत्यक्ष आरंभ केलेले पाहून ब्राह्मणेतरांनी त्यांची प्रशंसा केली.[25] जोतीरावांच्या कार्याच्या प्रभावाने अनेक गावातून त्यांना मार्गदर्शनासाठी निमंत्रणे येऊ लागली. अनेक महत्वाच्या ठिकाणी जोतीरावांनी समाजाचे ध्येय विशद करून कनिष्ठ वर्गातील लोकांना सत्यशोधक समाजाची तत्वे अनुसरून चळवळीस अंत:करणपूर्वक पाठिंबा देण्यासाठी विनंती केली. ब्राह्मणांच्या

मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करणे हे सत्यशोषक समाजाचे ध्येय आहे. हे त्यांच्या मनावर बिंबविण्याचा व त्यांनी आपले मानवी हक्क संपादन करून आपली उन्नती करावी, असे आपल्या समाजाचे ध्येय विशद करताना फुल्यांनी सांगितले. [26]

सत्यशोषक समाजाला सर्वांकडून पाठिंबा मिळून, श्रीमंत वर्गातूनही मदतीचे हात पुढे येऊ लागले. अनेक निष्ठावंत कार्यकर्ते खंबीरपणे उभे राहू लागले. जोतीरावांच्या अनेक कार्यात ते आधारस्तंभ बनू लागले. अशा पद्धतीचे कार्यकर्त्यांच्या वाढत्या संख्येने सर्व कार्ये पार पडू लागली. सत्यशोषक समाजाचा पहिला वार्षिक समारंभ मोठ्या थाटाने आणि उत्साहने साजरा करण्यात आला. त्या वेळी वार्षिक सभेमध्ये कार्यकारी मंडळात थोडा फेरफार करण्यात आला. नारायण तुकाराम नगरकर यांची कार्यवाह म्हणून निवड झाली, तर भालेकर आणि रामशेट उखणे यांची कार्यकारी मंडळावर निवड झाली. काही वजनदार ब्राह्मणेतरांना समाजाचे सभासद करून घेण्यात आले.

सत्यशोषक समाजाच्या कार्याने अनेक विचारवंताचे लक्ष वेधून त्यांची सहानुभूती मिळविली. सत्यशोषक समाजाला त्याच्या कार्याविषयी धन्यवाद देऊन एका नियककालीकेन म्हटले की, ''सत्यशोधक समाजाच्या कार्यापासून मुंबईतील पुनर्विवाह प्रसारक मंडळाने स्फूर्ती घ्यावी, धडा घ्यावा, कित्ता घ्यावा.''[27] तर ज्ञानोदयामध्ये एका वाचकाने आपल्या प्रतिक्रिया पुढील प्रमाणे व्यक्त केल्या, '' ज्ञानोदय होऊ लागल्यामुळे मतलबी ग्रंथकारांचा लोप होऊ लागलेला आहे. आपले हक्क कोणते, परस्परांनी कोणत्या नात्यांनी वागावे, चांगले काय, वाईट काय हे लोकांना कळू लागले आहे, असे जे काम करतात त्यांपैकीच सत्यशोधक समाज हा एक होय.''[28] या बोलक्या प्रतिक्रिया म्हणजेच जोतीरावांच्या कार्यात जनसामान्यामध्ये होत असलेल्या बदलाचे मूर्तीमंत उदाहरण होय.

1875 साली सत्यशोषक समाजाचा दुसरा वार्षिक समारंभ साजरा करण्यात आला.

त्यावेळी जोतीरावांनी समाजाचे अध्यक्षपदाची धुरा समाजाचे एक प्रभावी व तरूण नेते डॉ. विश्राम रामजी घोले यांच्या खांद्यावर दिली. सत्यशोधक समाजाचे सभासद प्रत्येक रविवारी संध्याकाळी जमत असत. प्रत्येक पंधरवड्यात एका शनिवारी तत्वप्रचारासाठी कार्यकर्ते तयार व्हावेत म्हणून त्यांच्यापुढे व्याख्याने होत असत. त्यांना वक्तृत्वकलेची शिकवण देण्यात येत असे. सत्यशोधक समाजाने जोतीरावांचे 'गुलामगिरी' व 'ब्राह्मणांचे कसब' या दोन ग्रंथांच्या प्रती हिंदी संस्थानिक आणि समाजातील प्रतिष्ठित लोक यांना विनामूल्य पाठविल्या. तर जोतीबांनी आपल्या उपरोक्त ग्रंथाच्या प्रती सत्यशोधक समाजाला देणगी म्हणून दिल्या. [29]

सत्यशोधक समाजाचे ध्येय कनिष्ठ वर्ग तसेच शेतकरी आणि कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे विचार तसेच शेतकरी आणि कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य ही याच वर्गाच्या प्रश्नांशी निगडीत असल्याचे दिसते. याच कालखंडामध्ये सत्यशोधक समाजाने एका निबंध स्पर्धा जाहीर केली.हा निबंध ब्रिटनमधील शेतकी-पद्धती वर आधारीत होता. यावरुन फुल्यांचा दृष्टिकोण किती व्यापक होता हे दिसून येते. पुण्यातील सत्यशोधक समाजाने पुण्यातील कनिष्ठ वर्गातील मुले रस्त्यातून गारूड्यांचे खेळ बघत वा तमाशे पाहत भटकू नये म्हणून अशा मुलांवर देखरेख करण्यासाठी एका शिपायाची नेमणूक केली. [30]

शैक्षणिक कार्य ही सत्यशोधक समाज तेवढ्याच तत्परतेने पार पाडत असलेला दिसून येतो. शाळेतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन, मुलांच्या दृष्टीने योग्य व उपयोगी साधने वापरण्यासाठी फुले उत्तेजन देते. स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज करून, काही प्रमाणात गरीब ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षण देण्याची प्रार्थना केली. त्या अर्जातील त्यांचा हेतू सफल झाला.

पुण्यातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणो लोण पोचविण्यास सुरूवात केली. त्यांनी पुण्याजवळील हडपसर गावी एक शाळा काढली. हडपसर हे सत्यशोधक समाजाचे एक मोठे केंद्र बनले. कनिष्ठ वर्गातील पाच टक्के विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षण देण्यासाठी आज्ञापत्र काढले याबद्दल शिक्षण खात्याचे संचालक चेटफिल्ड यांचे सत्यशोधक समाजा तर्फे आभार मानण्यात आले. सत्यशोधकाच्या कार्याविषयी आपुलकी दाखवून त्या कार्याला प्रसिद्धी देणाऱ्या 'सत्यदिपीकेला, 'सुबोधपत्रिके'ला आणि 'ज्ञानप्रकाश' ला धन्यवाद देण्यात आले. सत्यशोधक समाजाच्या शिक्षणकार्याच्या प्रसारामध्ये हरिरावजी चिपळूणकरांनी सहाय्य केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देण्यात आले. [31]

थोडक्यात आपण असे म्हणून शकतो की महाराष्ट्रात स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण, चळवळ, शेतकरी-मजदूर जागृती आणि ब्राह्मणेत्तर चळवळ यांचे जन्मदाते महात्मा फुलेच आहेत. [32] आणि सत्यशोधक समाजाद्वारे हि कार्ये तडीस नेताना दिसून येते. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून जोतीराव फुले यांचे समाजसुधारक म्हणून एक वेगळेच स्थान प्रस्थापित होते. यापूर्वीच्या समाजसुधारकांचे सामाजिक अन्यायाविरोधात संघर्ष करीत असताना जाती व्यवस्थेच्या चौकटीतूनच सुधारणा करण्याचे प्रयत्न झाले. मूलत: सामाजिक व्यवस्थेलाच आव्हान करणारे तसेच जातीव्यवस्थेला छेद देणारे विचार पहिल्यांदाच जोतीबा फुले यांच्याकडून मांडण्यात आले. त्याचे कारण जोतीबांना आपल्या आयुष्यात आलेल्या अनुभव आणि जातीव्यवस्थेची झळ शूद्र, अतिशूद्र, आणि स्त्रीया यानांच सोसावे लागते हे त्यांनी जाणले होते.

जोतिबांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीचे रूपांतर ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादात झाले. त्यांना जोतिबांच्या बुद्धिवादाचा व विश्वमानवतावादाचा स्पर्श झालेला नाही. असे दिसते. सत्यशोधक चळवळीचा विपर्यास म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होय. भारताला परकीय आक्रमणापेक्षा

यादवी युद्धाचा धोका अधिक आहे. जोतीबांनी सांगितलेले अर्धसत्यच या चळवळीमध्ये अजून प्रभाव गाजवीत आहे. जोतीबांनी सांगितलेले विचार जातिभेदातील व धर्मभेदातीत होते हे लक्षात घेतले तरच जोतिबांच्या सत्याचे संपूर्ण स्वरूप लक्षात आले असे होईल.[33]

या शोधनिबंधात सत्यशोधक स्थापना का कार्य अभ्यासण्याचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे महात्मा फुल्यांचा समाजपरिवर्तनाचा आणि नवसमाज उभारणीचा ध्येयवादी कार्यक्रम जास्त करून सत्यशोधक समाजाद्वारे पार पाडले गेले आहे. त्यांनी स्पष्ट केलेल्या त्रिसूत्री कार्यक्रमावरुन व प्रमुख तत्त्वांवरुन जातीसंस्था, परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, लींगभेदावर आधारित विषमता नष्ट करणे हेच या समाजाचे मुख्य कार्य बनते. उच्चवर्गीयापासून सर्वसामान्य, स्त्री, शूद्र, अतिशूद्र लोकांना मुक्त करून त्यांचा विकास करणे हा महत्त्वपूर्ण उद्देश्य सत्यशोधक समाजाचा होतो.

या समाजाद्वारे फुल्यांनी जुन्या अंधश्रद्धा, वाईट चालीरीती, शेतीविषयक प्रश्न, सामाजिक विषमता, मानसिक, धार्मिक गुलामगिरी, असमानतेची जळमटे नष्ट करण्यावर भर दिला. या सर्व गोष्टींना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्त्रीवर्गच मोठ्या प्रमाणात बळी पडत होता. त्याचप्रमाणे अंधश्रद्धा व चालीरितींशी स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणात निगडीत आहे. भट, पुरोहीत हे याचा फायदा करून घेण्यासाठी त्यांना एखादी वाईट, अशुभ गोष्ट घडेल असे सांगून त्यावर उपाय सांगण्यासाठी मोठ्या प्रमाणात दक्षिणा घेत असत. स्त्रिया आपल्यावरील संकट टाळण्यासाठी पुरूषांच्या माघारी दक्षिणा देत. त्यांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी शूद्र, अतिशूद्र, अस्पृश्य वर्गाच्या उद्धाराचे कार्य केले. ब्राह्मण रस्त्याने जाताना या लोकांनी मध्ये येऊ नये. या लोकांना शिक्षणाचा अधिकार नाही. धार्मिक कार्यात सहभाग नाही. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश नाही. सार्वजनिक ठिकाणी थांबावयाचे नाही असा त्याकाळी ब्राह्मण, उच्च वरिष्ठ वर्गाचा दंडुका होता. पण या सर्व बाबी स्त्रियांनाही वर्ज्य होत्या. समाजामध्ये ब्राह्मण, उच्चवर्गीय व शूद्र, अतिशूद्र,

अस्पृश्य वर्गामध्ये असमानता होती. उच्चपदांवर, चांगल्या प्रकारचे काम, अर्थार्जन करण्याची संधी, वेद, उपनिषदे, धर्म ग्रंथ वाचण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. जो तळागाळातील आणि स्त्रीवर्गाला सुद्धा नव्हता.

'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न त्यांनी हाताळले आहेत. त्यावर उपाय योजना सांगितल्या आहेत. शेतकरी, शेतमजुर यांची जमीनदार सावकार-व्यापारी कशी पिळवणूक करीत होते याचे विदारक चित्र रेखाटले आहे. शेतामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्री काम करते. पुरूषांना जो त्रास होतो त्यापेक्षा थोडा अध्कि त्रास स्त्री वर्गाला होतो. कारण जमीनदार-सावकार यांचा या स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण वाईट असतो. त्यामुळे कधी कधी त्यांच्या अत्याचाराला, वासनेला स्त्री बळी पडते. शेतात राबणाऱ्या स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने वेतन दिले जात नाही. आजही शेतात राबणाऱ्या स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने समान वेतन दिले आज नाही शिवाय वरील सव्र प्रकार अजूनही स्त्रियांच्या बाबतीत घडतात. यावरुन त्यांच्या एकूण शेतकऱ्यांच्या विचारामध्येही स्त्रियांच्या उत्कर्षाचा विचार अंतर्भूत होतो असे आपण म्हणून शकतो. त्यांच्यातील दारिद्र्याचे प्रमाणही अधिक आहे. विविध कारणांवरुन भारतातील स्त्रियांच्या दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. अनेक कारणांसाठी गरीब कुटुंबे अर्थार्जनासाठी स्त्रियांवर अवलंबून दिसतात. हे प्रमाण खेडेगावात मोठ्या प्रमाणात 30 ते 35% इतके आहे. यासाठी वेगवेगळ्या योजनांखाली दिल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या मदतीची आकडेवारी पाहिल्यास एक गोष्ट आपल्या लक्षात येते ती म्हणजे आठव्या पंचवार्षिक योजनेनुसार दारिद्र्य निवारण करण्यासाठी असलेल्या एकूण योजनेचा लाभ 30 ते 40% स्त्रियांनी घेतलेला आहे. उदा.IRDP, TRYSEM, - जवाहरलाल रोजगार योजना, इंदीरा अवास योजना QWCRA[34] इ. मात्र अशा योजना असल्यातरी स्त्रियांची आर्थिक स्थिती व दर्जा न सुधारलेलाच वाटतो.

सत्यशोधक समाजाद्वारे बहुजन समाजावरील अन्याय, अत्याचार, विषमता नष्ट करण्याचा व त्यांना न्याय मिळवून देण्याचा जो प्रयत्न म. फुल्यांनी केला आहे तो दृष्य स्वरुपात नसला तरी अप्रत्यक्षरित्या स्त्री प्रश्नांनीच निगडीत होता. याच प्रश्नांचा पाठपुरावा शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या शरद जोशी यांना शेतकरी कामगार संघटने द्वारे करावा लागतो. यावरुन फुल्यांनी त्या काळात मांडलेल्या शेतकऱ्यांच्या विचारावरुन 100 वर्षाहून अधिक काळ उलटून गेला तरी व उत्पादन साधने बदलून ही शेतकऱ्यांची अवस्था मात्र आज ही तशीच जाणवते हे आपणास मान्य केले पाहिजे. 21 व्या शतकाच्या उंबरठ्यात प्रवेश करतानाही भारतातील स्त्रियांना पाण्यासाठी कीती वणवण करावे लागते हे सांगण्याची गरज नाही. याचे कारण आजही अपूर्ण राहीलेले पाणी प्रकल्प आहेत. यासाठी अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरण यासारखे घटक कारणीभूत असू शकतात. दारूबंदीची मागणी आज मोठ्या प्रमाणात होत आहे कारण याप्रश्नासही प्रापंचिक जबाबदारीमुळे स्त्रीलाच सामोरे जावे लागते. पाणी प्रश्न,दारुबंदी हे आपण उदाहरणादाखल पाहिले मात्र समाजात असलेल्या स्थायी, अस्थायी स्वरुपाच्या अनेक प्रकारच्या समस्या असतात. आज ही स्त्रियांनी स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक घटकांवर कुटुंबाचा, समाजाचा व संस्कृतीचा किंवा आर्थिक बाबींचा जबरदस्त प्रभाव अजून हि आढळून येतो. आणि याच गोष्टींचा फुल्यांनी स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार करून वैचारिक बैठकीतून व चळवळीद्वारे उच्चाटन करण्याचा प्रत्यन केला. आज स्त्री अभ्यसास केंद्रांद्वारे हेच प्रश्न हाताळून, स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्याचा प्रत्यन केला जात आहे. समाजाच्या तीन तत्त्वावरुन बहूजन समाजाला अनेक प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा तळमळीचा आणि निकराचा प्रयत्न म. फुल्यांनी केला.

## : संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| 1. | बा. ग. पवार | युगपुरूष महात्मा जोतीराव फुले<br>मातृभूमी प्रकाशन, पुणे.<br>28 नोव्हें. 1991 पृ. क्र. 74 |
| 2. | धनंजय किर | महात्मा जोतीराव फुले<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई<br>चौथी आवृत्ती, 1992<br>पृ. क्र. 143-144 |
| 3. | वैद्य प्रभाकर | महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोक वाङ्मय गृह, मुंबई<br>प्रथमावृत्ती आक्टो- 74<br>पृ. क्र. 23 |
| 4. | बा. ग. पवार | उपरोक्त पृ. क्र. 75 |
| 5. | पंढरीनाथ सिताराम पाटील | महात्मा ज्योतिराव फुले यांचे चरित्र<br>रघुवंशी प्रकाशन, पुणे<br>पृ. क्र. 36 |
| 6. | बा. ग. पवार | उपरोक्त पृ. क्र. 75 |
| 7. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 145 |
| 8. | प्रा. रा. तु. भगत | महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव युनिव्हर्सल पब्लीकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 1973, पृ. क्र. 6 |
| 9. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 145 |
| 10. | डॉ. भालबा विभूते | महात्मा फुले- विचारधन प्रथमावृत्ती मार्च 1991<br>पृ. क्र. 5 |
| 11. | बा. ग. पवार | उपरोक्त पृ. क्र. 77-78 |

| | | |
|---|---|---|
| 12. | कुलकर्णी कृ. गो. | लेख- सत्यशोधक समाज महात्मा फले गौरव ग्रंथ संपादित |
| 13. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 145 |
| 14. | बा. ग. पवार | उपरोक्त पृ. क्र. 76 |
| 15. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र.145-146 |
| 16. | कीर, मालशे | महात्मा फुले : समग्र वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीमंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती 1980, पृ. क्र. 359 |
| 17. | कीर, मालशे | उपरोक्त पृ. क्र. 359 |
| 18. | डॉ. भालबा विभूते | उपरोक्त पृ. क्र. 12 |
| 19. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र. 146 |
| 20. | पंढरीनाथ सिताराम पाटील | उपरोक्त पृ. क्र. 40 |
| 21. | धनंजय कीर | उपरोक्त पृ. क्र.146-147 |
| 22. | पंढरीनाथ सिताराम पाटील | उपरोक्त पृ. क्र. 40 व 41 |
| 23. | बा. ग. पवार | उपरोक्त पृ. क्र. 80 |
| 24. | धनंजय किर | उपरोक्त पृ. क्र. 149 |
| 25. | कित्ता | पृ. क्र. 149-150 |
| 26. | कित्ता | पृ. क्र. 152-153 |
| 27. | कित्ता | पृ. क्र. 154-155 |
| 28. | कित्ता | पृ. क्र. 81 |
| 29. | कित्ता | पृ. क्र. 160 |
| 30. | कित्ता | पृ. क्र. 161 |
| 31. | कित्ता | पृ. क्र. 161 |

32. संपादक हरि नरके महात्मा फुले : साहित्य और विचार म. फुले चरित्र साधने प्राकशन समिती , मुंबई, प्रथमावृत्ती 1993, पृ. क्र. 194

33. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह, खंड पहिला श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्रथावृत्ती, 1982 पृ. क्र. 409

34. Country Report, New Delhi, 23-8-1995, P.N.46-47.

****